SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004.
P.G. Admission – 0231- 2609142, 2609488, 2609449.
Phone : EPABX – 2609000. Website :
www.unishivaji.ac.in
email : pgadmission@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. — ४१६००४.
पदव्युत्तर प्रवेश विभाग : २६०९१४२, २६०९४८८, २६०९४४९.
फोन : ईपीएबीक्स — 2609000. वेबसाईट :
www.unishivaji.ac.in
ई.मेल : pgadmission@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC (2021) with
CGPA 3.52

जा.क्र. शिवाजी वि./पी.जी.प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य/1789 दि. 03 NOV 2026

परिपत्रक

प्रति,

१. मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था

२. मा.अधिविभाग प्रमुख/समन्वयक/संचालक,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :— सन २०२६—२०२७ या शैक्षणिक वर्षातील 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती'बाबत..

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात आपणास कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठामार्फत प्रतिवर्षी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागामध्ये पदवी व पदव्युत्तर नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या हुशार, गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांना एकूण सात प्रकारामध्ये 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' प्रदान करण्यात येते.

विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल, २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेत जे विद्यार्थी/ विद्यार्थीनी ६० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून गुणानुक्रमे पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेले आहेत व पुढील शिक्षणासाठी आपल्या महाविद्यालय /अधिविभागामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेला आहे, अशा संभाव्यपात्र विद्यार्थी/विद्यार्थीनींना संपर्क करून त्यांचे ऑनलाईन नामाकंन अर्ज **https://sukapps.unishivaji.ac.in/exam-app/#/login**. या लिंकवरून दि.२३/११/२०२६ पूर्वी **महाविद्यालय/अधिविभाग** यांनी बिनचूक भरावयाचे आहेत. संभाव्य पात्र विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी व शिष्यवृत्तीची नियमावलीही विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील 'Shivaji University Merit Scholarship' 2026-2027 या लिंकवर ठेवण्यात आली आहे.

सदर नामाकंन अर्ज सादर करताना सोबत जोडण्यात आलेल्या सूचनापत्रानुसार संबंधितांनी पुढील कार्यवाही करावी.
कळावे,

आपला विश्वासू

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी :
१) स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु यांचे कार्यालय
२) स्वीय सहाय्यक, मा. प्र— कुलगुरु यांचे कार्यालय
३) स्वीय सहाय्यक,मा. कुलसचिव यांचे कार्यालय
४) स्वीय सहाय्यक, मा. वित्त व लेखाधिकारी यांचे कार्यालय
५) स्वीय सहाय्यक, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे कार्यालय

माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी :—
१) प्र. संचालक, संगणक केंद्र
२) उपकुलसचिव, ऑन परीक्षा विभाग
३) विभागप्रमुख, सर्व ऑन परीक्षा विभाग
४) आवक विभाग :— सदर शिष्यवृत्तीसाठी येणारे अर्ज पदव्युत्तर प्रवेश विभाग येथे पाठविणेत यावेत.